अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ३७/२०१८
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ८४१८ दि. १०/१२/२०१८

## अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/३७/२०१८

**श्री दीपक शामलाल आगरवाल**
३१ मुंबई पुणे रस्ता, बोपोडी,
पुणे ४११ ००३

---------------------- अपिलार्थी

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका
**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
अति. महापालिका आयुक्त कार्यालय (ई) कार्यालय, पुणे महानगरपालिका

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

**श्री दीपक शामलाल आगरवाल** रा. ३१ मुंबई पुणे रस्ता, बोपोडी, पुणे ४११ ००३ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ११.१०.२०१८ रोजी अर्ज करून १) जे. बी. पवार यांना आर. टी. आय. कायदा अंतर्गत झालेल्या दंडाची व शास्तीची संपूर्ण माहिती मिळावी, २) दंड भरलेल्या पावत्यांची प्रत मिळावी. ३) दंड व शास्ती झालेल्या कारणांची माहिती मिळावी, ४) दंड व शास्ती झाल्यानंतर झालेल्या प्रमोशनची माहिती मिळावी. " ई. माहिती मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत आस्थापना विभागाने जा. क्र. जमाअ/आस्था/६८९१ दि. २३.१०.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे. तसेच जन माहिती अधिकारी, अति. महापालिका आयुक्त (ई) कार्यालय पुणे मनपा यांनी जा. क्र. १३४५ दि. २४.१०.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ११.१०.२०१८ | ११.१०.२०१८ | १०.११.२०१८ | २३.१०.२०१८ व २४.१०.२०१८ | - |

अपिलार्थी यांनी त्यावर अपील क्र. ३७/२०१८ चा अपील अर्ज दि. २२.११.२०१८ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २२.११.२०१८ | २२.११.२०१८ | २२.११.२०१८ | होय. | - |

सदर प्रकरणी दि. १५.१२.२०१८ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री दीपक शामलाल आगरवाल रा. ३१ मुंबई पुणे रस्ता, बोपोडी, पुणे ४११ ००३ उपस्थित होते व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी श्री विजय पवार हुद्दा लिपिक टंकलेखक व श्री अजय कारंडे जन माहिती अधिकारी, मा. अति. महापालिका आयुक्त कार्यालय (ई) कार्यालय , पुणे मनपा हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याचे सांगितले. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी श्री विजय पवार हुद्दा लिपिक टंकलेखक यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/६८९१ दि. २३.१०.२०१८ ने उत्तर दिलेले आहे असे सांगितले तर श्री अजय कारंडे जन माहिती अधिकारी, अति. महापालिका आयुक्त कार्यालय (ई) कार्यालय, पुणे मनपा यांनी जा. क्र. १३४५ दि. २४.१०.२०१८ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे सांगितले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी, मा. अति. महापालिका आयुक्त (ई) कार्यालय, पुणे महानगरपालिका व जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी अर्जदार यांच्या मूळ अर्जातील विषयासंबंधीत त्याचेकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदार यांना १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून देण्यांत यावी. अपील क्र. ३७/२०१८ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका